## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ मधील सुधारणा

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००६

**विद्युत अधिनियम, २००३**

क्रमांक मविनिआ/लिगल/१३०/२००६/ - विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) मधील कलम १८१ च्या उप-कलम (२) चा खंड (b) सह कलम १५ चे उप-कलम (१), कलम १८१ च्या उप-कलम (२) चा खंड (c) सह कलम (१५) चे उप-कलम (२), कलम १८१ च्या उप-कलम (२) चा खंड (d) सह कलम १६, कलम १८१ च्या उप-कलम (२) चा खंड (e) सह कलम १८च्या उप-कलम (२) चा खंड (a) आणि कलम १८१च्या उप-कलम (२) चा खंड (f) सह कलम १८च्या उप-कलम (२) चा खंड (c) आणि कलम १८१च्या उप-कलम (२) चा खंड (zp) अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, याद्वारे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ मध्ये खालील सुधारणा करीत आहे-

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ च्या प्रकरण २ कार्यपध्दतीविषयक बाबी मधील विनियम ४. ३ नंतर खालील प्रमाणे ४-अ समाविष्ट करण्यात आला आहे -

**" ४-अ पात्रतेच्या अटी /अपात्रता**

या विनियमाखाली परवाना देण्याकरिता पात्रतेच्या अटी/अपात्रता आयोग विनिर्दिष्ट करु शकेल. वर नमूद केलेल्या बाबींतील सर्वसाधारणता काहीही असली तरी, अधिनियमाखालील कर्तव्ये आणि बंधनांचे पालन करण्यासंबंधात सध्याची स्थिती किंवा परिस्थिती अर्जदाराच्या क्षमतेबाबत आयोगाच्या मते शंका निर्माण करणारी असेल तर, कोणताही अर्जदार या विनियमांखाली परवान्यासाठी पात्र ठरणार नाही.

स्पष्टीकरणः- या विनियमाच्या प्रयोजनार्थ "स्थिती किंवा परिस्थिती " म्हणजे व त्यामध्ये, अर्जदार किंवा त्याचा कोणताही भागीदार, संचालक किंवा प्रवर्तकाविरुध्द न्यायालयामध्ये गुन्हा शाबित झालेली प्रकरणे, किंवा समाजाच्या/जमातीच्या नैतिक श्रध्देला धक्का लागल्यामुळे संताप निर्माण करणारा एखादा गंभीर स्वरुपाचा अपराध; अर्जदार किंवा त्याच्या कोणत्याही भागीदार, संचालक किंवा प्रवर्तकाची नादारी किंवा

दिवाळखोरी; प्रलंबित न्यायालयीन खटले; नैतिक अधःपतन अंतर्भूत असलेला गुन्हा शाबित होणे, किंवा कोणताही आर्थिक गुन्हा; लबाडीच्या आणि अनुचित व्यापार प्रथा किंवा बाजारातील हातचलाखी; आर्थिक सचोटी; सक्षमता; लौकिक आणि चारित्र्य आणि अन्य कोणत्याही पुरेशा कारणामुळे ठपका ठेवण्यात आलेल्या / नियामक प्राधिकरणाने दिलेल्या प्रतिकूल आदेशाची प्रकरणे, यांचाही समावेश असेल.

परंतु असे की, आयोगाच्या कार्यालयात आणि/किंवा त्याच्या इंटरनेटवरील वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या नमुन्यात, आयोगाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली कागदपत्रे आणि माहितीसह हमीपत्र, अर्जदाराला त्याच्या अर्जासोबत पाठविण्यास आयोग सांगू शकेल.

परंतु आणखी असे की, अर्जदाराला त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय परवाना मिळविण्याचा कोणताही अर्ज नाकारण्यात येणार नाही. "

सही/-
(मालिनी शंकर)
सचिव, मविनिआ

मुंबई,
दिनांक २१ डिसेंबर, २००६